


स्थापना : १९०१ शतक महोत्सवी रजि.नं.ए.१० (को)

# श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था

२९६८ सी वॉर्ड, दसरा चौक, कोल्हापूर ४१६००२.

फोन नं. (०२३१) २६४२९२१, २६४०९२२

Email : shahuchh@gmail.com Website : www.shahuchhtrapatishikshan.com


चेअरमन, श्री मानसिंग विजयराव बोंद्रे

ऑन.सेक्रेटरी, श्री विजयराव श्रीपतराव बोंद्रे

जा.क्र.

दिनांक : ०४/०५/२०२२

प्रति,

**प्राचार्य / मुख्याध्यापक / ऑ. सुपरिटेंडेंट**

राजर्षि शाहू छ. इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी,

कोल्हापूर.

**विषय :- लोकराजा राजर्षि छत्रपती शाहूजी महाराज स्मृती शताब्दी दिनानिमित्त...**

महोदय,

लोकांचा राजा, राजर्षि शाहू छत्रपती महाराज यांच्या स्मृती शताब्दीचे हे वर्ष आहे. त्यानिमित्ताने हे वर्ष राजर्षी शाहू कृतज्ञता पर्व म्हणून सगळीकडे साजरे केले जात आहे.

शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या विकासासाठी सक्तीचे व मोफत शिक्षण तसेच कोल्हापूरामध्ये विविध समाजाच्या लोकांकरीता बोर्डिंगची उभारणी केली. त्यामध्ये सुरुवातीला सन १९०१ साली आपल्या संस्थेच्या मराठा बोर्डिंगची स्थापना केली हे आपणास ज्ञात आहेच. या दूरदृष्टी असलेल्या लोकराजाने ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी १०० वर्षापूर्वी शेती, जलसिंचन उद्योग क्षेत्रासह राधानागरी धरण, शाहू मिल, रेल्वे स्टेशन अशा सर्वच क्षेत्रात समाज उध्दाराचे काम केले. आरक्षणाचे जनक, उपेक्षितांसाठी काम करणारे, बहुजनांना सर्व क्षेत्रात प्रगतीपथावर नेण्यासाठी काम करणाऱ्या अशा लोकराजाला आपल्या संस्थेच्या वतीने अभिवादन करण्यासाठी **दि. ६ मे २०२२ रोजी सकाळी १० वाजता १०० सेकंद स्तब्ध राहून अभिवादन करण्याचे आयोजन केले आहे.**

त्याकरीता आपण आपल्या **सर्व शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांसह संस्थेच्या प्रांगणामध्ये सकाळी ९.४५ वाजता** उपस्थित रहावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू ,

For ऑफिस सुपरिटेन्डेट

श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था, कोल्हापूर

Noted
for circulation
A.P.

201
2021.22